महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६-अ नुसार आदिवासींच्या जमीन हस्तांतरणास परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक: आदिवासी ५१८८/प्र.क्र. ७५५/ल-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १४ फेब्रुवारी १९९२.

परिपत्रक :

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ३६-अ नुसार कुणाही अनुसूचित जमातीयेतर व्यक्तिला शासनाची पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज अनुसूचित जमातीच्या व्यक्तिची जमीन विक्रीद्वारे, देणगी देऊन, अदलाबदल करुन, गहाण ठेऊन, पट्टयाने देऊन किंवा अन्यप्रकारे हस्तांतर करुन घेता येत नाही. उपरोक्त कलमान्वये अनुसूचित जमातीतील व्यक्तिंकडून करण्यात येणाऱ्या वहिवाटीच्या हस्तांतरणावर निर्बन्ध घातले असले तरीसुध्दा अनुसूचित जमातीच्या व्यक्तिंच्या जमिनीचे शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतर होत असल्याची काही प्रकरणे शासनाच्या निदर्शनाला आलेली आहेत. शिवाय काही प्रकरणांत शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय अनुसूचित जमातीच्या व्यक्तिच्या जमिनीचे प्रथम हस्तांतर करवून घेऊन नंतर शासनाच्या परवानगीसाठी अथवा कार्योत्तर मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे प्रस्ताव येत असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. अनुसूचित जमातीच्या व्यक्तिंच्या जमिनीच्या हस्तांतरणाबाबत अवलंबिलेली अशाप्रकारची कार्यपध्दती [ Modus_Organdi ] ही अनुसूचित जमातीच्या उन्नतीसाठी केलेल्या कायद्यांचा विचार करता अत्यंत गंभीर स्वरुपाची व चिंताजनक बाब आहे. या परिस्थितीचा विचार करता अनुसूचित जमातीच्या व्यक्तिंच्या जमिनीचे हस्तांतर शासनाच्या पूर्वपरवानगी-शिवाय झाले असल्यास उपरोक्त कलमातील तरतुदींनुसार सदर जमीन प्रथम शासन जमा होणे आवश्यक आहे. असे न करता सदर जमिनीच्या हस्तांतरणास परवानगी देण्याबाबत अथवा कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल व जमीन हस्तांतरणास शासनाकडून परवानगी दिली जाणार नाही याची सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी कृपया नोंद घ्यावी व असे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घेण्याकरिता सर्व महसूल अधिकाऱ्यांना आदेश देऊन योग्य ठिकाणी नोटीस लावून व प्रसिध्दी देऊन सर्व जनतेच्या नजरेस आणण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ बा.ग.जोशी ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग.

प्रत -

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक